# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/05/2023 (बुधवार) दुपार

---

## अॅल्युमिनीयम तार चोरी

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत वाढोणा शेतशिवार येथे दिनांक ०५/०३/२०२३ चे ००/०० वा. ते १५/०५/२०२३ चे १२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मंगेश विलासराव शेगावकर, वय ४५ वर्ष, कनिष्ठ अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या काटोल कार्यालय खानगाव केंद्र फिर्यादी हे महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादित कार्यालय काटोल अंतर्गत खानगाव केंद्रामध्ये कनिष्ठ अभियंता पदावर कार्यरत असुन त्यांचे अखत्यारित असलेल्या वाढोणा गावचे शेत शिवारामधिल नौकरीया यांचे शेतातील डि. पी. वरून गेलेले सिमेंटच्या ७ पोलवरील १४०० फुट न्युट्रल अॅल्युमिनीयम तार किंमती अंदाजे ११२००/—रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक भारती सुरजुसे या करीत आहे.

## केबल चोरी

**पो.स्टे. वेलतूर** :— अंतर्गत १६ किमी अंतरावर मौजा सावंगी येथे दिनांक १५/०५/२०२३ चे ०६/०० वा. ते दिनांक १६/०५/२०२३ चे ०९/०० वा दरम्यान सामाजिक वनिकरण विभाग कुही अंतर्गत मौजा सावंगी येथे नर्सरी तयार करण्यात आली असून तेथे वेगवेगळया प्रजातिची रोपे तयार केलेली असून तेथे रोपांना पाणी देण्याकरीता सौर उर्जा पॅनल लावलेले आहे. त्या पॅनलला अंदाजे १५० फूट केबल लावलेले आहेत. कोणीतरी अज्ञात चोराने यातील सौर उर्जा पॅनलचे केबल १५० फूट किंमती अंदाजे ४०००/—रू चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन वेलतूर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना/विलास कोहळे ब. नं. १२९४ पो.स्टे वेलतूर हे करीत आहे.

## केबल चोरी

**पो.स्टे. अरोली** :— अंतर्गत ०८ किमी अंतरावर खापरखेडा जंगली शिवार येथे दिनांक १४/०५/२०२३ चे ००/०० वा. ते १५/०५/२०२३ चे १२/३० वा. दरम्यान सामाजिक वनिकरण विभाग कुही अंतर्गत मौजा सावंगी येथे नर्सरी तयार करण्यात आली असून तेथे वेगवेगळया प्रजातिची रोपे तयार केलेली असून तेथे रोपांना पाणी देण्याकरीता सौर उर्जा पॅनल लावलेले आहे. त्या पॅनलला अंदाजे १५० फूट केबल लावलेले आहेत. कोणीतरी अज्ञात चोराने यातील सौर उर्जा पॅनलचे केबल १५० फूट किंमती अंदाजे ४०००/—रू चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अरोली येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक बाजनघाटे मो. नं. ९५६१०३४२८७ हे करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत दहेगाव शिवार सदाशिव गोमासे यांचे शेताजवळ दिनांक १६/०५/२०२३ चे ०८/२० वा. ते ०९/१० वा. पर्यंत पोलीस स्टेशन पारशिवनी येथील स्टाफ पेट्रोलिंग करीत असतांना दहेगाव शिवार सदाशिव गोमासे यांचे शेताजवळ आरोपी नामे— अंकुश नथ्थूजी बोंदरेबावणे वय २८ वर्षे, रा. दहेगाव (जोशी) ता. पारशिवनी हा त्याच्या ताब्यातील ०१) लाल रंगाचा महिंद्रा यूवो ५७५ डी. आय. कंपनीचा ट्रॅक्टर मुंडा क्र. एम. एच.— ४०/ बी. ई— १६७५ किंमती अंदाजे ५,००,०००/— रू. ०२) एक लाल रंगाची ट्राली क्र. एम. एच.— ४०/ए एम.— २५५७ किंमती अंदाजे १,५०,०००/—रू यामध्ये अवैधरित्या विनापरवाना रेती भरून चोरटी वाहतूक करतांना मिळून आल्याने त्याचे ताब्यातील अंदाजे एक ब्रास रेती किंमती अंदाजे ५०००/— रू असा एकूण वाहनासह किंमती ६,५५,०००/—रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे रूपेश तुकाराम राठोड ब. नं. ८९४ पोस्टे पारशिवनी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरिक्षक मुंडे हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत जयभोले बिल्डींग छोरीया लेआउट रामटेक येथे दिनांक ०३/०४/२०२३ चे ०६/०० वा. ते दिनांक ०४/०४/२०२३ चे १४.०० वा. दरम्यान यातील अज्ञात चोराने जयभोले बिल्डींग छोरीया लेआउट रामटेक या इमारतीवरील वोडाफोन आयडिया मोबाईल टॉवर वरील ३ RRU (रुस कार्ड) एकुण किंमती १५,०००/— रु. चोरून नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना योगेश भुरे ८६६९१४७९७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**